अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । रविवार, दि. १३ जुलै २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : २८४ वा ▸ किंमत : ५ रूपये ▸ पाने ८+४

## मार्केट यार्डातील व्यापाऱ्यास पावणे तीन कोटींना लावला चुना

**सोलापूर :** सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या व्यापाऱ्याची साधारण २ कोटी ९१ लाख ५७ हजार २४६ रुपयांची फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. प्रेमनाथ दत्तात्रय कदम, (वय-४४ वर्षे, रा. प्लॉट नं ४०, नटराज हौसिंग सोसायटी, शेळगी) सोलापूर यांच्या फिर्यादीवरून संशयित आरोपी सुलेमान वाहिद तेली (वय ३३ वर्षे), याकुब वाहिद तेली (वय ३६ वर्षे, रा. ६९, बेगमपेठ विजापूर वेस, सोलापूर) यांच्यावर जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, दि २१ फेब्रुवारी २०२२ ते दि. ५ एप्रिल २०२२ या कालावधीत कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापूर मार्केड यार्ड येथे गाळा क्र. एल ०१/१४ ई ८० श्री सिध्देश्वर मार्केट यार्ड सोलापूर येथे घडली आहे. फिर्यादीचा कांदा व्यापार करत असून यातील आरोपींत मजकूर यांनी फिर्यादीची फसवणूक करण्याचा इरादा ठेवून फिर्यादीकडून ३२ हजार ४९२ रूपये पिशवी कांदा त्यांची एकूण किंमत रूपये २ कोटी ९१ लाख ५७ हजार २४६ रूपये एवढी होती. एवढ्या रकमेच्या कांदा खरेदीची रक्कम आजतागायत वेळोवेळी मागितली असता रक्कम दिली नसल्याने संशयित आरोपींवर (ता.१२) जुलै रोजी फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलिस निरीक्षक अजित लकडे हे करीत आहेत

# महाराष्ट्रात होणार राजकीय भूकंप?

## जयंत पाटलांनी सोडले प्रदेशाध्यक्षपद

## अजित पवार गटाची थेट ऑफर

## भाजपला 'आतून' आनंदाच्या उकळ्या



- शरदचंद्र पवार गटात मोठी घडामोड
- राजकीय पटलावर खळबळ
- दिवसभर निघाले ढवळून वातावरण
- शशिकांत शिंदेंच्या गळ्यात प्रदेशाध्यक्षपदाची वरमाला

**मुंबई/खास प्रतिनिधी**

**जयंत पाटील हे अखेर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदावरुन पायउतार झाले आहेत. शनिवार (ता.१२) त्यांनी प्रदेशाध्यक्ष पद सोडले आहे. ते पदावरुन बाजूला होताच त्यांना अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस गटाकडून पक्ष प्रवेशाची ऑफर देण्यात आली आहे. तर दुसरीकडे पाटील यांना पक्षात घेण्यासाठी पडद्यामागून हालचाली केलेल्या भाजपने सावध भूमिका घेतली असली तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाटील यांच्या अभिनंदनावर सूचक प्रतिक्रिया दिली आहे. भाजपला 'आतून' आनंदाच्या उकळ्या फुटत असल्याच्या प्रतिक्रिया समोर येत आहेत. यावरुन महाराष्ट्रात पुन्हा राजकीय भूकंप होण्याची चिन्हे दिसत असल्याचा शक्यता राजकीय जाणकारांकडून व्यक्त केली जात आहे.**

विशेषत्वे, जयंत पाटील यांच्या प्रदेशाध्यक्षपदाच्या राजीनाम्याने शरदचंद्र पवार पक्षात मोठी घडामोड घडली असून राज्याच्या राजकीय पटलावर खळबळ माजली आहे. राजीनाम्याच्या घटनेने दिवसभर वातावरण ढवळून निघाले आहे. पाटील यांनी राजीनामा दिल्यानंतर शशिकांत शिंदे यांच्या गळ्यात प्रदेशाध्यक्षपदाची वरमाला घालण्यात येणार असून यासंबंधी घोषणा परवा मंगळवारी १५ जुलै रोजी करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे या पदावरून अखेर पायउतार झाले आहेत. त्यांनी यापूर्वी अनेकदा मंचावरून जाहीरपणे ही इच्छा व्यक्त केली होती. प्रदेशाध्यक्ष पदावरून आता निवृत्ती द्या असे त्यांनी राष्ट्रवादीच्या मंचावरून म्हटले होते. ते आता पुढे कोणती भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राष्ट्रवादीतील या ताज्या घडामोडींमुळे पुन्हा नवीन भूकंप होणार का? अशी चर्चा रंगली आहे. पक्षातील काही नेत्यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीसोबत जाण्याची इच्छा व्यक्त केली होती. तर शरद पवार यांनी भाजपासोबत जाण्यास नकार दिला होता. त्यानंतर आता जयंत पाटील हे पायउतार झाल्याने ते कोणती भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

### आधीच दिले संकेत, पुढील धोरण काय?



राष्ट्रवादी फुटल्यानंतर जयंत पाटील हे शरद पवार यांच्यासोबत राहिले. त्यांच्याकडे पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदाची धुरा होती. आपल्याला आता या जबाबदारीतून मुक्त करावे असे त्यांनी यापूर्वी पक्षाच्या कार्यक्रमात अनेकदा भावना व्यक्त केली होती. तर नुकताच १० जून रोजी पक्षाचा वर्धापन दिन कार्यक्रम झाला. त्यावेळी मला पक्षाने आणि शरद पवार यांनी बरीच संधी दिली. सात वर्षांचा कालावधी दिला. शेवटी पक्षाने नव्या चेहऱ्यांना संधी देणे आवश्यक आहे. सर्वांदेखत त्यांना विनंती करेन की शेवटी पक्ष पवार साहेबांचा आहे. त्यांनी योग्य निर्णय घ्यावा. आपल्याला बरेच पुढे जायचे आहे, अशा भावना त्यांनी या कार्यक्रमात व्यक्त केल्या होत्या. आता पुढे जयंत पाटील हे कोणती भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पाटील यांच्या भाजप प्रवेशाची चर्चा तर खूप दिवसांपासून आहे. त्याशिवाय त्यांना राष्ट्रवादी अजित पवार गटाने ऑफर दिली आहे. मागच्या काही दिवसांपूर्वीच अजित पवार आणि जयंत पाटील यांच्यामध्ये सातारा जिल्ह्यात दीर्घवेळ चर्चा झाली होती. या चर्चेचादेखील संदर्भ आता लावला जात आहे.

### शशिकांत शिंदे यांची प्रतिक्रिया काय?



शशिकांत शिंदे यांनी या घडामोडींवर पहिली प्रतिक्रिया दिली आहे. १५ तारखेला पक्षाची बैठक होत आहे. काही नावांसोबत माझ्या नावाची चर्चा आहे. तुमच्या माध्यमातून माझ्या निवडीचे वृत्त कळाले आहे. शरद पवार यांच्या नेतृत्वातील या मोठ्या पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पद ज्याला मिळेल हे त्याचे भाग्य असेल असे मला वाटतं, असे शिंदे म्हणाले. तर जयंत पाटील यांच्या नेतृत्वात पक्षाने सर्व आव्हानांना तोंड दिले. लोकसभा, विधानसभा निवडणुका त्यांच्या कार्यकुशलतेत लढवल्या गेल्या. त्यांनी कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन काम केले. त्यामुळे त्यांनी तडकाफडकी नाही तर विचारपूर्वक राजीनामा दिला असे मला वाटते, असे शिंदे म्हणाले.

### जयंत पाटील भाजपात पळ काढतील वाटत नाही : आ. रोहित पवार

जयंत पाटील यांच्या राजीनाम्यावर आमदार रोहित पवार म्हणाले की, पाटील हे भाजपमध्ये पळ काढतील असे वाटत नाही. शरद पवारांना सोडून ते जाणार नाहीत, असे त्यांनी सांगितले. मला प्रदेशाध्यक्ष बनण्याची इच्छा नाही. आता बदल होण्याची वेळ आली आहे आणि त्याची सुरुवात झालेली आहे. पवार साहेब, जयंत पाटील आणि सुप्रिया सुळे यांच्यात झालेल्या बैठकीत पक्षाच्या आगामी धोरणावर चर्चा झाली. त्यानुसार, पक्षात काही महत्त्वाचे बदल होणार आहेत आणि हे सर्व जनतेला लवकरच दिसून येईल, असे रोहित पवार त्यांनी सांगितले.

### जितेंद्र आव्हाडांच्या प्रतिक्रियेमुळे वाढला संभ्रम

जितेंद्र आव्हाड यांनी त्यांच्या अधिकृत 'एक्स' अकाउंटवर ट्विट केलं आहे. मा. जयंत पाटील साहेब हे प्रदेशाध्यक्ष आहेत. त्यांच्या राजीनाम्याच्या बातम्या प्रसारीत होणे, हा निव्वळ खोडसाळपणा आहे. पक्ष एका नियमानुसार अन् शिस्तीनुसारच चालत असतो, असं जितेंद्र आव्हाड म्हणाले आहेत. जितेंद्र आव्हाड यांनी आपल्या मतानंतर आपलं नाव लिहिलं आहे. त्यानंतर कंसात आपलं पक्षाचं पदही लिहिलं आहे. त्यामुळे त्यांना त्यांच्याच पक्षातील काही नेते आणि पदाधिकाऱ्यांना कानपिचक्या द्यायच्या आहेत का? असा प्रश्न आता उपस्थित होतोय. जयंत पाटील यांनी राजीनामा दिला असताना तो नाही असा दावा आव्हाड यांच्याकडून केला जात आहे. शिवाय वेगळीच प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केल्याने संभ्रम वाढला आहे.

### माध्यमांनी पाटलांचा विषय काढताच अजित पवारांनी घेतला काढता पाय

बारामती दौऱ्यावर असलेल्या उपमुख्यमंत्री अजित पवारांनी माध्यमांशी संवाद साधला. युनेस्कोच्या यादीत महाराष्ट्रातील १२ किल्ल्यांचा सहभाग झाल्याप्रकरणी ते बोलत होते. यावेळी पत्रकारांनी जयंत पाटील यांच्या प्रदेशाध्यक्ष पदाच्या राजीनाम्याबाबत प्रश्न विचारला. मात्र जयंत पाटलांच्या राजीनाम्याचा प्रश्नावर अजित पवारांनी काढता पाय घेतला

### मुख्यमंत्री फडणवीसांची एका वाक्यात सूचक प्रतिक्रिया

माध्यमांनी जयंत पाटील यांच्या राष्ट्रवादी (शरद पवार गट) प्रदेशाध्यक्षपदाच्या राजीनाम्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारला होता. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका वाक्यात प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, तो त्यांच्या अंतर्गत प्रश्न आहे. ज्यांनी राजीनामा दिला त्यांनाही शुभेच्छा आणि जे नवीन होणार आहेत त्यांनाही शुभेच्छा. सर्वांनी चांगले काम करावे यासाठी शुभेच्छा, अशी सूचक प्रतिक्रिया मुख्यमंत्री फडणवीसांनी दिली.

### संग्राम जगताप म्हणाले, अजित पवार राष्ट्रवादीची ऑफर, होईल स्वागत !

संग्राम जगताप म्हणाले की, जयंत पाटील हे राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नसताना अनेक वेळा त्यांच्या मतदारसंघातील विविध विकासकामांच्या उद्घाटनाला देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती असायची. मात्र, प्रदेशाध्यक्ष झाल्यावर ते थांबले. जयंत पाटील हे राजकीय दृष्ट्या राष्ट्रवादीत अस्वस्थ आहेत, असं बोललं जायचं. अस्वस्थपणामुळे त्यांनी राजीनामा दिला असावा, असे त्यांनी म्हटले आहे. तर जयंत पाटील हे वेगळ्या पक्षात जातील, अशीही चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. याबाबत संग्राम जगताप यांना विचारले असता ते जर राष्ट्रवादी अजित पवार गटात आले तर आमच्यासारखे कार्यकर्ते त्यांचे स्वागतच करतील, असे त्यांनी म्हटले आहे.

## बाप्पा; विठुराया, तुच घालवलं रे आमच्यावरचं संकट!

# पंढरीत विजेच्या धक्क्यातून बालंबाल बचावले वारकरी

- दर्शन रांगेतील उड्डाणपुलामध्ये उतरला विज प्रवाह
- दर्शन रांग पुढे गेल्याने भाविकांचा वाचला जीव
- तीन श्वानांचा मात्र विजेच्या धक्क्याने तडफडून मृत्यू

**पंढरपूर/प्रतिनिधी**



पंढरपुरातील आषाढी यात्रा संपताना एक धक्कादायक प्रकार घडला आहे. मात्र विठ्ठलाच्या कृपेने खूप मोठा अनर्थ टळला आहे. दर्शन रांगेतील उड्डाणपुलात विद्युत प्रवाह उतरला. मात्र विजेचा धक्का बसण्यापासून वारकरी बालंबाल बचावले. बाप्पा; विठुराया, तुच घालवलं रे आमच्यावरचं संकट या शब्दात वारकऱ्यांसह मंदिर समिती प्रशासनाने आपल्या कृतज्ञतेच्या भावना श्री विठ्ठलाबद्दल व्यक्त केल्या.

दरम्यान या दूर्देवी घटनेत तीन कुत्र्यांना मात्र आपला जीव गमवावा लागला आहे. आषाढी यात्रा संपत आल्याने भाविकांची गर्दी कमी झाली असली तरी देखील अजूनही दर्शन रांग ही गोपाळपूर पत्रा शेडकडे जाणाऱ्या मार्गावर असते. याच दर्शन रांगेत पंचमुखी मारुती मंदिराच्या समोर असणाऱ्या उड्डाण पुलावर सायंकाळी कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणातून वीज प्रवाह असलेली वायर पडली आणि विजेचा प्रवाह या उड्डाणपूल व शेजारील रांगेत उतरला.

विठ्ठलाच्या कृपेमुळे या भागातील दर्शन रांग थोडी पुढे गेली होती आणि यामुळे या उड्डाण पुलावर भाविक नव्हते. मात्र जेव्हा या उड्डाणपुलाला कुत्रे चिटकले आणि काही क्षणातच ते तडफडू लागले. त्याच्या पाठोपाठ इतर दोन कुत्रेही अशाच पद्धतीने विजेचा झटका लागून तडफडल्यावर परिसरातील नागरिकांना हा धक्कादायक प्रकार समजला आणि त्यांनी तत्काळ विद्युत विभागातील कर्मचाऱ्यांना बोलावून घेतलं. या कर्मचाऱ्यांनी तत्काळ आधी हा विजेता प्रवाह खंडित केला आणि नंतर तुटलेल्या धोकादायक वायर बाजूला काढल्या. मात्र हा सर्व प्रकार मंदिराची दर्शन रांग बनविणाऱ्या एका बेशिस्त कर्मचाऱ्यांमुळे घडल्याचे समोर आले आहे.

### दर्शन रांगेच्या ठेकेदाराचा गलथानपणा; कठोर कारवाईची जोरदार मागणी

दर्शन रांगेत लावलेले स्पीकर सोडवताना त्याने हिसका देऊन वायर तोडली आणि ती वायर तशीच या उड्डाण पुलावर पडली आणि अडकली. आज पुन्हा विठ्ठलाच्या दर्शनाची रांग या पुलाच्याही पुढे गेली असून काल सायंकाळी विठ्ठलाच्या कृपेने या ठिकाणी कोणताही भाविक रांगेत उभा नव्हता. अन्यथा संपूर्ण आषाढी यात्रा व्यवस्थित झाली असताना एक खूप मोठी दुर्घटना घडू शकली असती. आता या प्रकाराला जबाबदार असणाऱ्या आणि भाविकांच्या जीविताशी खेळ करणाऱ्या सर्वांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. या सर्व प्रकारात दर्शन रांगेच्या ठेकेदाराचा गलथानपणा समोर आला असून देवाच्या कृपेने भाविक जरी या अनर्थापासून वाचले असले तरी तीन मुक्या जनावरांचा यात हकनाक बळी गेला आहे.

### तीन श्वानांचा निष्पाप बळी

कर्मचाऱ्यांच्या बेशिस्त आणि बेपर्वामुळे व उड्डाणपुलाला कुत्रे चिटकले आणि काही क्षणातच ते तडफडू लागले. त्याच्या पाठोपाठ इतर दोन कुत्रेही अशाच पद्धतीने विजेचा झटका लागून तडफडल्यावर परिसरातील नागरिकांना हा धक्कादायक प्रकार समजला आणि त्यांनी तात्काळ विद्युत विभागातील कर्मचाऱ्यांना बोलावून घेतलं. या कर्मचाऱ्यांनी तत्काळ आधी हा विजेता प्रवाह खंडित केला आणि नंतर तुटलेल्या धोकादायक वायर बाजूला काढल्या. या निष्पाप श्वानांचा जीव गेल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आता किल्ले मोकळा श्वास घेतील !

**संगम श्री डे**
**190-00-578**

**कल्याण**
**458-77-467**

